Indian Journal of Social Sciences and Literature Studies
Vol. 8, Issue 1, March 2022
ISSN 2349-5634 (Print) ISSN 2455-0973 (online)

# माध्यमिक शाळेतील अनाथ व सामान्य मुलांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास

**प्रा. डॉ. विजय संपतराव माळी**

**सारांश**

माध्यमिक शाळेतील अनाथ व सामान्य मुलांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तूत संशोधन हाती घेण्यात आले. या संशोधनात सातारा, सांगली, कोल्हापूर येथील माध्यमिक शाळेतील 100 अनाथ व 100 सामान्य विद्यार्थ्यांची प्रदत्त म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा वयोगट 10 ते 14 वर्षे इतका होता. नमुन्याची निवड सहेतूकपणे करण्यात आली. संशोधनासाठी डॉ. मेघा कुमठेकर आणि अपर्णा जोशी (2007) यांची (CPQ) बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावली वापरण्यात आली. संख्याशास्त्रीय विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाण विचलन व 'टी' चाचणीचा वापर करण्यात आला. या अभ्यासातील प्राप्त फलितांवरून असे दिसून आले की, अनाथ मुलांमध्ये अंतर्मुखता, भावनिक अस्थिरता, अधीनता, चिंताग्रस्तपणा अधिक दिसून येतो.

**प्रस्तावना** (Introduction) -

व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व हे दोन शब्द मराठीत आपण एकाच अर्थाने वापरतो. व्यक्तित्व हे सजीव प्राणिमात्राचे प्राथमिक रुप आहे. व्यक्तित्व (Individuality) ही नैसर्गिक देणगी आहे. प्रत्येक सजीवाला व्यक्तित्व असतेच. परंतू मनुष्याच्या बाबतीत विकसनशील व्यक्तित्व व्यक्तिमत्वात रुपांतरीत होते. एखादी व्यक्ती कशी आहे याचा आपण जेंव्हा विचार करतो तेंव्हा त्या व्यक्तीची शारीरिक ठेवण, बुध्दी, चारित्र्य, अभिवृत्ती, अभिरुची, कर्तृत्व, स्वभाव इत्यादी गोष्टी विचारात घेतो. त्या व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दीक, नैतिक, सामाजिक विकास कितपत झाला ते आपण पाहतो. व्यक्तीच्या वर्तनाची सर्वांगस्पर्शी गुणात्मकता विचारात घेवून व्यक्तिमत्व ठरविले जाते. व्यक्तित्वात एकांगी स्वरुपाचा विचार होतो. तर व्यक्तिमत्व हे विविध घटकांना स्पर्श करते.

➢ **अनाथ (Orphan)**

अधुनिक युगात आज तंत्रज्ञान, विज्ञान, औद्योगिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर प्रगती झाली असली तरी चंगळवाद मोठया प्रमाणावर वाढला आहे. समाजात दारिद्र्य, बेरोजगारी, अनैतिक संबंध, अपघात एच.आय.व्ही सारख्या अनाथ मुलांचे प्रमाण वाढत आहे. अनैतिक संबंधातून अनेक ठिकाणी मुले सोडून दिलेल्या घटना आपण प्रसारमाध्यमांद्वारे पाहत असतो. तसेच एच.आय.व्ही. सारख्या आणि इतर गंभीर आजाराला बळी पडणाऱ्या पालकांचा मृत्यू झाल्याने, पाल्याचा सांभाळ करणारे कोणीच नसल्याने अनाथ मुले समाजात दिसून येतात.

सामान्य मुलांना शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक वातावरण लाभल्याने त्यांच्या तुलनेत अनाथ मुलांना असे वातावरण कमी प्रमाणात लाभल्याने त्यांच्या व्यक्तिमत्वावर कोणता परिणाम होतो. त्यामध्ये काय उणिवा राहतात का तसेच अशा अनाथांना सांभाळ करण्यासाठी शासकिय, निमशासकिय, संस्था, संघटना मोठया प्रमाणावर काम करताना दिसून येतात.

1896 साली महर्षी धो. के. कर्वे यांनी पुण्यामध्ये अनाथ बालिकाश्रम सुरू केला. त्यामधून सध्याची हिंगणे स्त्रिशिक्षण संस्था उदयास आली. 1898 मध्ये मुंबई, मद्रास अशा मोठया शहरांमध्ये कुमार्गाला लागलेल्या स्त्रियांसाठी सरकारी आश्रम काढण्यात आले. 1889 मध्ये पंडिता रमाबाई यांनी 'रमाबाई असोसिएशन' तर्फे मुंबई व पुणे येथे केवळ विधवांसाठी 'शारदासदन' नावाची संस्था सुरू केली पण ती अल्पकालीन ठरली.

2001 मधील सर्व्हेनुसार अनाथांची भारतामधील संख्या 21 मिलियन इतकी दिसून आली आहे. यामध्ये 12.6 मिलियन पुरूष आणि 9.3 मिलियन स्त्रियांचा समावेश आहे. या संदर्भात विमेन्स अँड चिल्ड्रेन्स इंस्टिटयुशन्स लायसेन्सिंग ॲक्ट (1956), द ऑर्फनेज अँड अदर चॅरिटेबल इंस्टिटयुशन्स सुपरव्हिजन अँड कंट्रोल (1960) हे कायदे भारतामध्ये लागू आहेत. (राज्यस्तरीय मध्यवर्ती सस्था ऑक्टों. 2014)

**पूर्व संशोधन आढावा**

लान्झ व इतर (1999) यांनी अमेरिकेतील अनाथ मुलांच्या व्यक्तिमत्व विकास, समस्यावर संशोधन केले. प्रस्तुत संशोधनासाठी नमूना म्हणून अमेरिकेतील 70 इतक्या विद्यार्थ्यांची निवड केली गेली. त्यांचा वयोगट 14 वर्षे इतका होता. यामध्ये 35 मुले आणि 35 मुली होत्या.

माहिती गोळा करण्यासाठी Self Esteem Inventory (SEI) आणि Eysenck Personality Questionnaire (EPQ) या साधनांचा वापर करण्यात आला. प्रस्तुत अभ्यासामध्ये असे दिसून आले की, सामान्य मुलांच्या तुलनेत अनाथ मुलांमध्ये एकलकोंडेपणा समूहात एकत्र न राहणे, संप्रेषणाचा अभाव, अंतर्मुखता इत्यादी गुणवैशिष्ठये अधिक प्रमाणात दिसून येतात.

Imlahi (2015) यांनी अनाथ मुलांच्या बुध्दिमत्ता व पर्यावरणीय घटक या समस्येवर संशोधन केले. प्रस्तुत संशोधनासाठी नमुना म्हणून शाळेमधील 140 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यांचा वयोगट 7 ते 11 वर्षे इतका होता. प्रस्तुत अभ्यासामध्ये असे दिसून आले की, झोपेची कमतरता मानवी बुध्दीवर प्रचंड प्रभाव पाडते. तसेच खेळ, पालक असणे किंवा नसणे, आहार याही घटकांचा बुध्दिमत्तेवर परिणाम झाल्याचे दिसून येते.

## संशोधन पध्दती

**1. अभ्यासाचा हेतू :**

माध्यमिक शाळेतील अनाथ व सामान्य मुलांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे.

**2. उदिष्ठये:**

**प्रस्तुत अभ्यासामध्ये खालीलप्रमाणे उदिष्ठये मांडण्यात आली.**

1. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील बहिर्मुखतेचा अभ्यास करणे.
2. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील भावनिक स्थिरतेचा अभ्यास करणे.
3. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील वर्चस्वाचा अभ्यास करणे.
4. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील चिंताग्रस्ततेचा अभ्यास करणे.

**3. सिध्दांत कल्पना :**

1. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील बहिर्मुखतेबाबत भेद दिसून येईल.
2. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील भावनिक स्थिरते बाबत भेद दिसून येईल.
3. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील वर्चस्वाबाबत भेद दिसून येईल.
4. सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील चिंताग्रस्ततेबाबत भेद दिसून येईल.

**4. परिवर्त्ये -**

**1. स्वतंत्र परिवर्त्य -**

1. आनाथ मुले - मुली (100)
2. सामान्य मुले - मुली (100)

**2. अवलंबी परिवर्त्य -**

1. बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावली मधील 14 घटक.

**5. नमुना (Sample) -**

प्रस्तुत अभ्यासाठी सातारा, सांगली, कोल्हापूर परिसरामधील विविध माध्यमिक विद्यालय आणि संस्थेतील सामान्य व अनाथ मुलांचा नमुना म्हणून निवड करण्यात आली. यामध्ये आठवीमध्ये शिकत असणाऱ्या 100 सामान्य आणि 100 अनाथ मुला - मुलींचा समावेश करण्यात आला. त्यांचा वयोगट 10 ते 14 वर्षे इतका होता. संशोधन कार्यासाठी मदत करण्याची तयारी, इच्छा दर्शविलेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यासामध्ये समावेश करण्यात आला. त्यांच्य वेळेनुसार व सोयीनुसार त्यांच्याकडून बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावली सोडवून घेण्यात आली.

**6. मापन साधने -**

1. **बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावली (2007) -**

परिक्षणार्थीच्या व्यक्तिमत्वाचे मापन करण्यासाठी पॉटर आर. बी. आणि कॅटेल आर. बी. (1975) यांची बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावली वापरण्यात आली. या प्रश्नावलीची मूळ आवृत्ती इंग्रजीमध्ये असून डॉ. मेघा कुमठेकर आणि अपर्णा जोशी (2007) यांनी या प्रश्नावलीचे मराठीत रुपांतर केले आहे. या चाचणीत 'अ' आणि 'ब' असे दोन भाग असून या दोन भागांचे पुन्हा अ1, अ2 आणि ब1, ब2 असे दोन-दोन भाग करण्यात आले आहेत. यातील प्रत्येक विधानासाठी (अ, ब) दोन पर्याय दिलेले आहेत (अ,ब) यातील लागू होणारा एक पर्याय परिक्षणार्थीला निवडायचा असतो. स्टेन्सीलच्या सहाय्याने चाचणीचे गुणांकन करता येते. चाचणीची विश्वसनीयता आणि यथार्थता उच्च असल्याची चाचणी पुस्तिकेनुसार दिसून आली.

**7. कार्यविधी (Procedure) -**

प्रथम संबंधित विद्यालय आणि संस्थांना भेट दिली तेथील मुख्याध्यापक आणि संस्थापकांची संशोधन विषयाबाबत चर्चा केली व त्यांची पूर्वपरवानगी मिळाल्यावर शाळेमधील व संस्थेमधील विद्यार्थ्यांना भेटून त्यांच्या सोयीचा दिवस व वेळ निश्चित केली. पूर्वनियोजनानुसार शाळेला आणि संस्थेला भेट देवून बालकांची व्यक्तिमत्व प्रश्नावली विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात आली व शेवटी सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानन्यात आले.

**सांख्यिकीय विश्लेषण आणि निष्पत्ती**

सामान्य मुले आणि अनाथ मुले यांच्यातील व्यक्तिमत्वाचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास हाती घेण्यात आला.

**1. सामान्य मुले आणि अनाथ मुले यांच्यातील बहिर्मुखतेबाबत सरासरी, प्रमाण विचलन, टी मुल्य दर्शविणारा तक्ता**

**तक्ता क्रमांक 4.1**

| समुह | संख्या | सरासरी | प्रमाण विचलन | 'टी' मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **अनाथ मुले** | 100 | 9.04 | 0.670 | 11.12 | 0.01** |
| **सामान्य मुले** | 100 | 10.03 | 0.7 | | |

**तक्ता क्रमांक 4.1 वरुन असे दिसून येते की**, अनाथ मुलांचे बहिर्मुखतेबाबतचे मध्यमान 9.04 असून प्रमाण विचलन 0.670 आहे. तर सामान्य मुलांचे बहिर्मुखतेबाबतचे मध्यमान 10.03 असून प्रमाण विचलन 0.7 आहे. वरील माहितीवरुन 'टी' मुल्य काढले असता ते 11.12 इतके मिळाले आहे. ते सार्थकतेच्या 0.01 पातळीवर सार्थ ठरले आहे. म्हणजेच बहिर्मुखता या व्यक्तिमत्व गुणाबाबत सामान्य व अनाथ मुलांबाबतीत लक्षणीय फरक दिसून येतो. म्हणजे सामान्य मुले ही अनाथ मुलांपेक्षा अधिक बहिर्मुख असल्याचे दिसून येते तर अनाथ मुले ही अधिक अंतर्मुख असल्याचे दिसून येते. म्हणजेच सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील बहिर्मुखतेबाबत भेद दिसून येईल ही सिध्दांतकल्पना सार्थ ठरलेली आहे.

**सामान्य मुले आणि अनाथ मुले यांच्यातील भावनिक स्थिरतेची सरासरी, प्रमाण विचलन, 'टी' मुल्य दर्शविणारा तक्ता**

**तक्ता क्रमांक 4.2**

| समुह | संख्या | सरासरी | प्रमाण विचलन | 'टी' मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **अनाथ मुले** | 100 | 7.82 | 0.773 | 3.41 | 0.01** |
| **सामान्य मुले** | 100 | 8.25 | 1.089 | | |

तक्ता क्रमांक 4.2 वरुन असे दिसून येते की, अनाथ मुलांचे भावनिक स्थिरतेबाबतचे मध्यमान 7.82 असून प्रमाण विचलन 0.773 आहे. तर सामान्य मुलांचे भावनिक स्थिरतेबाबतचे मध्यमान 8.25 असून प्रमाण विचलन 1.089 आहे. वरील माहितीवरुन 'टी' मुल्य काढले असता ते 3.41 इतके मिळाले आहे. ते सार्थकतेच्या 0.01 पातळीवर सार्थ ठरले आहे. म्हणजेच भावनिक स्थिरता या गुणाबाबत सामान्य व अनाथ मुलांमध्ये लक्षणीय फरक दिसून येतो. म्हणजेच अनाथ मुलांच्या तुलनेत सामान्य मुलांमध्ये भावनिक स्थिरता अधिक असल्याचे दिसून येते. तर अनाथ मुलांमध्ये भावनिक अस्थिरता दिसून येते ही सिध्दांतकल्पना सार्थ ठरली आहे.

प्रस्तुत संशोधनाला अनुसरून संशोधन साजद हुसैन यांनी जयपूर (राजस्थान) मधील 100 किशोरवयीन आनाथ मुलांवर भावनिक बुध्दिमत्ता, सामाजिक बुध्दिमत्ता या घटकाबाबत केले आहे. त्यांना असे दिसून आले की, अनाथ मुले त्यांच्या भावनांचे विघटन करतात. त्यामुळे अनाथ मुलांमध्ये भावनिक अस्थिरता अधिक प्रमाणात असल्याचे संशोधनामध्ये दिसून आले आहे.

**2. सामान्य मुले आणि अनाथ मुले यांच्यातील वर्चस्वाबाबतची सरासरी, प्रमाण विचलन, 'टी' मुल्य दर्शविणारा तक्ता**

**तक्ता क्रमांक 4.3**

| समुह | संख्या | सरासरी | प्रमाण विचलन | 'टी' मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **अनाथ मुले** | 100 | 3.16 | 0.751 | 6.60 | 0.01 |
| **सामान्य मुले** | 100 | 3.88 | 0.857 | | |

तक्ता क्रमांक 4.3 वरुन असे दिसून येते की, अनाथ मुलांचे वर्चस्वाबाबतचे मध्यमान 3.16 असून प्रमाण विचलन 0.751 आहे. तर सामान्य मुलांचे वर्चस्वाबाबतचे मध्यमान 3.88 असून प्रमाण विचलन 0.857 आहे. वरील माहितीवरुन 'टी' मुल्य काढले असता ते 6.60 इतके मिळाले आहे. ते सार्थकतेच्या 0.01 पातळीवर सार्थ ठरले आहे. म्हणजेच वर्चस्वाबाबत

सामान्य व अनाथ मुलांमध्ये लक्षणीय फरक दिसून येतो. अनाथ मुलांपेक्षा सामान्य मुलांमध्ये वर्चस्वता अधिक दिसून येते, तर अनाथ मुले ही अधीन असल्याचे दिसून येते. म्हणजेच सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील वर्चस्वाबाबत भेद दिसून येईल ही सिध्दांतकल्पना वरील निकषांनी स्विकारली आहे.

प्रस्तुत संशोधनाला अनुसरून Parry आणि Kumar (2016) यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील वर्चस्वता या समस्येवर संशोधन केले. यामध्ये असे दिसून आले की, सामान्य मुलांमध्ये अधिक वर्चस्वता दिसून आल्याचे संशोधनात स्पष्ट झाले आहे.

**3. सामान्य मुले आणि अनाथ मुले यांच्यातील चिंताग्रस्तता बाबतची सरासरी, प्रमाण विचलन, 'टी' मुल्य दर्शविणारा तक्ता दर्शविणारा तक्ता**

**तक्ता क्रमांक 4.4**

| समुह | संख्या | सरासरी | प्रमाण विचलन | 'टी' मुल्य | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|
| **अनाथ मुले** | 100 | 10.00 | 0.5 | 7.46 | 0.01** |
| **सामान्य मुले** | 100 | 7.62 | 1.002 | | |

तक्ता क्रमांक 4.4 वरुन असे दिसून येते की, अनाथ मुलांचे चिंताग्रस्तबाबत मध्यमान 10.00 असून प्रमाण विचलन 0.5 आहे. तर सामान्य मुलांचे चिंताग्रस्तबाबत मध्यमान 7.62 असून प्रमाण विचलन 1.002 आहे. वरील माहितीवरुन 'टी' मुल्य काढले असता ते 7.46 इतके मिळाले आहे. ते सार्थकतेच्या 0.01 पातळीवर सार्थ ठरले आहे. म्हणजेच चिंताग्रस्तता या घटकाबाबत सामान्य व अनाथ मुलांमध्ये लक्षणीय फरक दिसून येतो. म्हणजेच सामान्य मुलांपेक्षा अनाथ मुलांमध्ये चिंताग्रस्त भाव अधिक दिसून येतो. म्हणजेच सामान्य मुले व अनाथ मुले यांच्यामधील चिंताग्रस्तबाबत भेद दिसून येईल, ही सिध्दांतकल्पना वरील निकषांनी स्विकारली आहे.

प्रस्तुत संशोधनाला अनुसरून इर्शाद (2017) यानी सौदी अरेबियातील ताणविषयी सामान्य व अनाथ मुले यांच्यामध्ये काही फरक आहे का या समस्येवर संशोधन केले. यामध्ये असे दिसून आले की, अनाथ मुलांना तणावाला सामोरे जावे लागत असल्यामुळे, पालकांना गमावलेल्या अनुभवांमुळे मुलांमध्ये जास्त मानसिक अडचणी व चिंता दिसून येतात. असे संशोधनात दिसून आले.

**1. निष्कर्ष** :

**प्रस्तुत अभ्यासातील प्राप्त झालेल्या फलितांवरुन खालील निष्कर्ष मिळाले ते पुढीलप्रमाणे**

1. सामान्य मुलांच्या तुलनेत अनाथ मुलांमध्ये अंतर्मुखता अधिक असल्याचे दिसून येते.
2. सामान्य मुलांच्या तुलनेत आनाथ मुलांमध्ये भावनिक अस्थिरता अधिक असल्याचे दिसून येते.
3. सामान्य मुलांच्या तुलनेत अनाथ मुलांमध्ये वर्चस्वता अधिक असल्याचे दिसून येते.
4. सामान्य मुलांच्या तुलनेत अनाथ मुलांमध्ये चिंताग्रस्तपणा अधिक असल्याचे दिसून येते.

**2. मर्यादा**

**प्रस्तुत अभ्यासात खालील काही मर्यादा आहेत**.

1. प्रस्तुत संशोधनामध्ये मर्यादित लोकसंख्येचा प्रतिनिधिक नमुना निवडलेला आहे.
2. प्रस्तुत संशोधनामध्ये मर्यादित संख्याशास्त्रीय पदधतीचा वापर केलेला आहे.
3. प्रयुक्ताची निवड सहेतुक नमुना निवड पदधतीने करण्यात आलेली असल्याने या पदधतीच्या मर्यादांचा निष्कर्षावर काही परिणाम होणे स्वाभाविक होते.
4. प्रयुक्तांचा वयोगट एक समान नसल्याने गुणांकामध्ये फरक दिसून येतो.

**3. शिफारशी** -

1. व्यापक नमुना घेवून व्यापक स्वरुपात संशोधन हाती घेण्यात येईल.
2. प्रस्तुत अभ्यासात लिंगभेदाचा अभ्यास केला नाही तो करता येईल.
3. संशोधनाची व्यापकता वाढवून निष्कर्षांचे सामान्यीकरण करता येईल.

**4. अभ्यासाचे चिकित्सालयीन उपयोजन**

सामान्य मुलांना आई-वडील पालक असल्याने त्यांचे शैक्षणिक, कौटूंबिक, सामाजिक व करिअर क्षेत्रात त्यांना मदत करणारे, सांभाळणारे पाठिंबा देणारे असतात. तुलनेने ज्यांना जन्मजातच सांभाळणारे, पालनपोषण करणारे कोणीच नसते. जे इतर नातेवाईक त्यांच्यासोबत राहतात किंवा समाजातील अनाथाश्रमामध्ये राहतात अशा अनाथ मुलांच्या व्यक्तिमत्वामध्ये आई-वडील नसल्याने शैक्षणिक, करिअर, सामाजिक क्षेत्रात कोणत्या समस्या निर्माण होतात का? व्यक्तिमत्व विकासामध्ये काही अडथळे निर्माण होतात का? व्यक्तिमत्व विकासामध्ये भेद दिसून येतो का? याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तूत अभ्यास हाती घेण्यात आला.

या अभ्यासात अनाथ मुलांमध्ये अंतर्मुखता, भावनिक अस्थिरता, अधीनता, निरुत्साहीपणा, लाजाळूपणा, साधेपणा, अपराधीपणा अधिक दिसून येतो. तर सामान्य मुलांमध्ये बर्हिमुखता, भावनिक स्थिरता, वर्चस्वता, उत्साहीपणा, धाडसीपणा, धूर्तपणा, आत्मविश्वास अधिक दिसून येतो. तसेच सामान्य व अनाथ मुलांमध्ये बुध्दीमत्ता, कठोरपणा, सद्सदविवेकबुध्दी, नियंत्रितस्वेच्छा, या घटकाबाबत कोणताही भेद दिसून येत नाही.

अनाथ मुलांच्या व्यक्तिमत्वाला अडथळा ठरणाऱ्या या घटकांना दूर करण्यासाठी तसेच त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक करिअरचा दर्जा उंचवण्यासाठी विविध सामाजिक कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेणे, स्वावलंबन निर्माण करणे, स्व आश्वासंकतेमध्ये वाढ करणे, जीवनसमाधानाचे निकष उंचावणे, जीवनाचे महत्व पटवून देणे इत्यादी कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करुन अनाथ मुलांना सामान्य मुलांप्रमाणेच विकासाच्या संधी उपलब्ध करुन देता येईल व व्यक्तिमत्व विकासातील अडथळे दूर करता येतील असे म्हणता येते.

**संदर्भ**


- Banoo J., Vaida N., Nadeem and Bhat B. A. (Feb 2017) comparative study on physical deformity and hearing impairment of adolesents on the basis of home, social, school and emotional adjustment : *International jouranal innovative research and review ISSN:* 2347-4424 vol-5.
- Barlow D.H., Durand M.V. (2005) *Abnormal psychology an integrative approach*: cengage learning India private limited, New delhi-P. 57-59
- Hurlock B.E. (1978) Child Development: ML Graw Hill Book Co-singapore LTD New delhi-p. 79-103
- Hurlock B.E. (1983) Personality Development: Tata MC Graw- Hill publishing company LTD New delhi-p. 351-380
- Kimball young (2001) personality and problems of adjustment: surjeet publications, delhi-110007, India p. 332-358
- Lambert R. Paulo.T. (May 2017) *Conceptualization of students with and without disabilities as mathematical problem solvers in educational research*: A Critical Review:Education Sciences(2017) p. 2-18
- Lauren B.A., John H.R., Margaret J.M.,(2006) Abnormal psychology, Current perspectives (Ninth edition): Tata mcgraw Hill publishing company LTD. New delhi, p 2-18
- Michel W. Shoda y. Smith R.(2004) Introducation to personality towards an integration: John and sons. Inc. p. 43-56
- Mohammad N. and tovakkom (2010) *comparing self-esteem and self-concept of handicapped and normal students: procedia social and behavional scieness* (2010) p. 1554-1557
- Ranjan S.P.(2014) *A comparative study of adjustment and achievement motivation of normal and physically handicapped college student*: The international journal of Indian psychology, p. 94-99
- Sarason G.I. S.arason R.B. (2007) Abnormal psychology the problem of maladaptive behavior, 11th edition: person education Inc and Dorling kinders ley publishing Inc. New Delhi 110017, India p. 501-560

- Shahnawaz M. and Akhouri D.(2016) *Self Esteem, Anxiety, Depression and stress among physically Disabled people, International journal of psychology, Indian psychology*, p. 125-132
- Sharma G. (2004) *A Comparative study of the personality chamacteristies of primary school students with learning Disabilities and their nonleurning disabled pecrs: learning disability ouately volume 27 summer* 2004, p-127-140
- अभ्यंकर, ओक, गोळविलकर (2013) मानसशास्त्र : वर्तनाचे शास्त्र. पिअरसर, दिल्ली 210-222